सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

विद्याविकास
स्वरंग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक

संदर्भ क्र: विविमं/२०२३–२४/३८१ दिनांक : १०/०६/२०२४.

प्रति,
**मा. डॉ. विजय जानराव काकडे**
विद्या प्रतिष्ठानचे,
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
विद्यानगरी ता. बारामती, जि. पुणे

**विषय : विद्यार्थी विकास मंडळ वार्षिक पारितोषिक प्रदान व गौरव समारंभ.**

महोदय/महोदया,

वरील विषया संदर्भात आपणांस कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाच्या विविध योजना व इतर उपक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणारे विद्यार्थी कल्याण अधिकारी निवड करण्याकरिता नियुक्त केलेल्या समितीने आपली पुणे ग्रामीण विभागातील **'प्रभावी अंमलबजावणी करणारे विद्यार्थी कल्याण अधिकारी'** म्हणून **विभागून** निवड केली आहे. याबद्दल आपले विद्यापीठाच्यावतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाचा पारितोषिक वितरण समारंभ मंगळवार, दि. १८ जून, २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता संत ज्ञानेश्वर सभागृह, मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे** येथे संपन्न होणार आहे. यावेळी आपणास सदर पारितोषिक माननीय कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी व इतर मान्यवर ह्यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

प्रस्तुत कार्यक्रमात पुरस्कार प्राप्त महाविद्यालये/परिसंस्थांचे सन्माननीय प्राचार्य/संचालक यांना विनंती की, आपल्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी कल्याण अधिकारी यांची उपस्थिती सुनिश्चित करावी. वर नमूद केलेल्या दिवशी कार्यक्रमासाठी प्रवास/निवास खर्च या विभागातर्फे अनुज्ञेय होणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे, ही विनंती.

**(डॉ. अभिजीत कुलकर्णी)**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

प्रत माहिती व योग्य त्याकार्यवाहीसाठी : मा. प्राचार्य, विद्या प्रतिष्ठानचे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, विद्यानगरी ता. बारामती, जि. पुणे